ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 11 | JULY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# "छत्रपती शाहु महाराजांच्या कृषी क्षेत्राच्या विकासाची प्रासंगिकता – एक चिकीत्सक अध्ययन"

प्रा.डॉ.गजानन बी. बनचरे
विभाग प्रमुख – अर्थशास्त्र , श्री.प.दि.जैन कला महाविद्यालय, अनसिंग ता.जि. वाशिम.

**प्रस्तावना :**




भारतात छत्रपती शाहु महाराजांना लोकतंत्रवादी व समाजसुधारक म्हणुन ओळखले जाते. त्यांना कोल्हापूर संस्थांनच्या इतिहासात असाधारण स्थान आहे. छत्रपती शाहु महाराज राजा असून त्यांना समाजातील दलित आणि शोषित वर्गासाठी मोफत शैक्षणिक सोयी उपलब्ध करुन दिल्या. अशा महान समाजसुधारकाचा जन्म दि.26 जुलै 1874 व मृत्यू 10 मे 1922 रोजी झाला. राजर्षी शाहूंनी समाजिक क्षेत्राप्रमाणेच आर्थिक क्षेत्रातही मुलगामी स्वरुपाची धोरणे अंमलात आणुन मागासवर्गीयांना आर्थीक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. आपल्या संस्थानातील पायाभूत सुविधांची निर्मीती केली. शेती, उदयोग व व्यापार इत्यादी क्षेत्रांचा विकास झाल्यास जनतेचे दारीद्र याचे उच्चाटन होईल अशी छत्रपती शाहु महाराजांची खात्री होती. शाहु महाराजांनी कार्ल मार्क्स प्रमाणे सामाजिक न्यायाच्या संदर्भात आर्थिक विकासाला महत्व दिले आहे. आर्थीक विकास हेच वंचित, शोषीत मागासवर्गीयांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी आधारभूत मानले आहे.

कोल्हापूर संस्थानातील 90 टक्के जनतेची उपजिवीका शेतीवर अवलंबून होती. औद्यागिक विकासाची गती कृषी क्षेत्राच्या विकासाखेरीज वाढणे अशक्य आहे. त्यामुळे शाहू महाराजांनी शेती विकासाला अग्रक्रम दिला. त्यासाठी त्यांनी 1902 मध्ये इटली सारख्या कृषीप्रधान देशाला भेट दिली. तेथील कृषी धोरणाचे सुक्ष्म निरिक्षण केले. या निरिक्षणावरुन त्यांच्या लक्षात आले की, प्रगत देशाच्या तुलनेत आपल्या देशातील कृषीची उत्पादकता कमी आहे. कृषीची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीचे आधुनिकीकरण करणे आणि शेती व्यवसायाला प्रतिष्ठा मिळवून देणे हाच कृषी विकासाचा पाया आहे. अशी शाहू महाराजांची खात्री होती.

शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी कृषी धोरण, कृषी विकासासाठी सिंचन सुविधा, धरणे, सुधारीत बि–बियाणे, अवजारे, प्रदर्शने, आधुनिक पिके, तुकडेबंदी इत्यादी उपाय योजना केल्या. त्यामुळे कृषी विकासाला चालना मिळाली. राजर्षी शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी केलेले प्रयत्नातून राष्ट्र विकासाला एक नवीन दिशा मिळेल यासाठी प्रस्तुत "छत्रपती शाहु महाराजांच्या कृषी क्षेत्राच्या विकासाची प्रासंगिकता – एक चिकीत्सक अध्ययन" हा विषय लघु शोध निबंधासाठी निवडला आहे.

## • शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी केलेले कार्य :–

**1.** इ.स. 1896–97 आणि 1899–1900 या काळात कोल्हापूर संस्थानात दोन मोठे दुष्काळ पडले होते. दुष्काळावर मात करण्यासाठी व शेतीच्या शास्वत विकास करुन तथा शेतीला पुरेसा व हमखास पाणी पुरवठा होण्यासाठी 1902 मध्ये "सार्वत्रिक पाटबंधारे धोरण" जाहिर केले. त्यासाठी त्यांनी पाटबंधारे खाते व इरिगेशन ऑफिसरची नेमणुक केली. त्याच प्रमाणे सिंचन विकासाच्या योजना त्वरीत अंमलात आणल्या. नव्या व जुन्या विहीरी,

छोटे–मोठे तलाव, लहान– मोठे बंधारे यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेतली. तसेच नाल्यामध्ये दगड–रेती टाकून बंधारे बांधले. या सुविधामुळे कोल्हापूर संस्थान मध्ये कृषी क्षेत्रात क्रांती घडून येण्यास मदत झाली.

**2.** कोल्हापूर संस्थानातील शेती सुजलाम् सुफलाम् होण्यासाठी, संपूर्ण जमीनक्षेत्र सिंचन क्षेत्राखाली येण्यासाठी '**राधानगरी**' धरणाची कल्पना त्यांच्या मनात आली. 1909 मध्ये राधानगरी धरणाच्या बांधकामाला सुरुवात केली. 1918 सालापर्यंत राधानगरी धरणास 14 लाख रुपये खर्च करण्यात आले आणि चाळीस फुटापर्यंत बांधकाम झाले. या धरणातून दरवर्षी सहाशे दशलक्ष घनफुट पाणी शेतीसाठी उपलब्ध झाले. शेतीला बारा महिने पाणी उपलब्ध झाल्याने शाहू महाराजांचे हरित क्रांतीचे स्वप्न त्यांच्या हयातीत साकार झाले. त्यामुळे कोल्हापूर संस्थानमध्ये कृषी विकासाला चालना व रोजगाराच्या संधीत वाढ होण्यास मदत झाली.

**3.** युरोपमध्ये शेती शास्त्रीय पध्दतीने केली जात असल्याने शेतीपासून अधिक उत्पादन घेता येते. हे शाहू महाराजांनी प्रत्यक्ष पाहिले होते. तेव्हा आपल्या देशातही कृषी क्षेत्रात शेतीसंबंधी आधुनिक बियाणे, रासायनिक खते, व आधुनिक मशागत पध्दती याचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. याचा फायदा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात झाला. यावरुन शाहू महाराजांना शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करायची होती. असे म्हणता येईल.

**4.** कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांना शेतीसंबंधी आधुनिक साधनांची माहिती व प्रसार व्हावा या उद्देशाने घोडे व गुरांची वार्षिक प्रदर्शना बरोबरच कृषी उत्पादनाची दालन मांडण्याची प्रथा सुरु केली. शाहू महाराजांनी चिंचली या गावी 4 फेब्रुवारी 1896 रोजी पहिले प्रदर्शन भरविले. प्रदर्शनामध्ये मोठया संख्येने शेतकरी वर्ग यावा यासाठी कुस्त्यांची दंगल, मर्दानी खेळाचे सामने व हत्तीच्या झुंज यासारखे करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले. शाहू महाराजांनी शेती उत्पादन वाढविण्यासाठी शेतीसंबंधी आधुनिक साधनांचा प्रचार व प्रसार व्हावा. यासाठी केलेले प्रयत्न निश्चित मोलाचे आहे. असे संशोधक या नात्याने म्हणता येईल.

**5.** शेतीमध्ये परंपरागत पिकांबरोबर आधुनिक पिके जसे चहा,कॉफी, रबर, वेलदोडे, कोको यासारखी पिके घेतली तर शेतीक्षेत्राचा कायापालट होऊ शकेल याची खात्री शाहू महाराजांना होती. म्हणुन शाहु महाराजांनी संस्थानातील पश्चिम भागात मुबलक पर्जन्यमान असणाऱ्या सहयाद्रीच्या भागात नव्या पिकांची लागवड केली. संशोधीत वाणाची पिके यांच्या रोपांची लागवड शेतकऱ्यांनी करावी. यादृष्टीने अनेक रोपवाटीका दरबारातर्फे तयार करुन घेतल्या. शाहू महाराजांनी शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यासाठी आधुनिक शेती कशी फायदेशीर आहे. हे दर्शविले आहे. आजच्या शासनकर्त्यांनी शाहु महाराजांच्या शेतीसंबंधी सुधारणा प्रत्यक्ष लागू केल्या असत्या तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी प्रस्तुत धोरण उपायकारक ठरले असते. त्यामुळे शाहू महाराजांनी कृषी क्षेत्रात स्विकारलेल्या तत्कालीन धोरण आजही प्रासंगिक आहे. असे संशोधन कर्त्याचे मत आहे.

**6.** कुटुंबातील वाढत्या सदस्यसंख्येमूळे शेत जमिनीचे हिस्से–वाटे होत राहिल्याने शेतीचा आकार लहान–लहान होत आहे. छोटया आकाराची शेत जमिन कसण्यासाठी अडचण व आर्थीक दृष्टया परवडणारी नसल्याने उदरनिर्वाह कठीण होते. त्यामूळे उपासमारीचे संकट कोसळते. परीणामी तरुणामध्ये गुन्हेगारीची प्रवृत्ती निर्माण होते. याची खात्री शाहू महाराजांना होती म्हणुन त्यांनी सर्व वतनी जमीनी अविभाज्य करुन टाकल्या. एवढेच नव्हे तर सामान्य शेतकऱ्याच्या मुलांनी शेती बरोबरच शेती पुरक व्यवसाय करावा यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे शेती क्षेत्रातील हंगामी बेरोजगारी दूर होवून शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या उत्पन्नात वाढ होईल. शाहू महाराजांचे हे विचार देशातील शेतकरी, शेतमजूर व देशातील बेरोजगारी लक्षात घेता प्रासंगिक ठरणारे आहे. असे म्हणता येईल.

आज भारतात 70 टक्के जनता शेती व्यवसायाशी निगडीत आहे. देशात शेतीचा विकास पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही. यामुळे शेती व्यवसायाशी निगडीत असलेल्या लोकांची आर्थिक स्थिती हलाखीची आहे. त्याच बरोबर देशात 2/3 शेत जमिन कोरडवाहु आहे या जमिनीपासून देशातील शेतकरी व शेतमजुरांना वर्षभर

काम मिळत नाही. त्यांना बेरोजगारीचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारी व आत्महत्येची वेळ येत आहे. त्याचबरोबर शेतीचा विकास न झाल्याने औद्योगिक क्षेत्राचा विकासही मंद गतीने होत आहे. परिणामी औद्योगिक क्षेत्रात पुरेशा रोजगाराच्या संधी निर्माण होत नाही. परिणामतः देशात बेरोजगारी ही एक भीषण समस्या बनली आहे.

भारतातील बेरोजगारी, दारिद्रय उपासमार, आर्थिक विषमता, औद्योगिक क्षेत्राचा मंद विकास व शेतकऱ्यांच्या आत्महत्या या समस्यांचे निराकरण करुन आर्थिक न्याय प्रस्थापित करावयाचा असेल तर शाहू महाराजांच्या शेती विषयक धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या कृषी विषयक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे देशातील कृषी क्षेत्राचाही विकास होण्यास मदत होईल. देशातील कृषी व औद्योगिक क्षेत्राचा विकास झाल्यास भारत एक विकसित राष्ट्र बनेल. असा संशोधन कर्त्याचा अभिप्राय आहे.

## संदर्भ ग्रंथ –

1. पवार जयसिंगराव – राजर्षी शाहू छत्रपती : 'जिवन व कार्य' महाराष्ट्र इतिहास, प्रबोधीनी कोल्हापूर प.आ.1 जाने. 2012 पृ.क.141
2. भोळे भा.ल. – "छत्रपती शाहु महाराज" ,श्री गंधर्व वेद प्रकाशन, पूणे नोव्हे.2010 पृ.क.90
3. घाटावकर भास्कर (संपा.), पाटील शामराव (संकलक), राजर्षी शाहू छत्रपतीचे निवड आदेश भाग –1, पुरा. विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई 1988 पृ.क.85,86
4. Mohpare R.S. and Patil J.F, OP. Cit.P. 126,136,150